भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. २३५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०५/०५/२०१८

१) पाळण्याचे दोरीने गळा आवळुन जिवानीशी महिलेला ठार केल्याने गुन्हा नोंद. :–

दिनांक ०३/०५/२०१८ चे १८.३० यातील आरोपी याने त्याची पत्नी सौ. मनिष प्रफुल तागडे हिचे चारीत्र्यावर संशय घेवुन तिचेशी भांडण करून तिला बांधलेल्या पाळण्याचे नॉयलॉन दोरीने गळा आवळुन तिला जिवानीशी ठार केले अशा फिर्यादी जागेश्वर यवनकुमार वैदय वय ४२ वर्ष रा. परसोडी/ सौंदड यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३०२ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. वर्मा पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.आरोपी अटक आहे.

२) संगनमत करून अश्लिल शब्दात शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद. :–

दिनांक ०४/०५/२०१८ चे १६.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही विदयमान न्यायालय भंडारा येथे साक्षपेशी करून सेंटपॉल शाळे समोर ऊभी असतांनी यातील आरोपीतांनी संगनमत करून सार्वजनीक ठिकाणी फिर्यादीस अश्लिल शब्दात शिवीगाळ करून थापड बुक्यानी मारपीट करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २९४, ३२३,५०६,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गायधने पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

३) संगनमत करून अश्लिल शब्दात शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद. :–

दिनांक ०४/०५/२०१८ चे ०६.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही आपले घरासमोरील आगण झाडीत असतांना यातील आरोपी क्र. ०१ ने हिने जुने जागेच्या वादावरून फिर्यादीचे घरासमोर रोडवर येवुन फिर्यादीस अश्लिल शब्दात शिवीगाळ करू लागली फिर्यादीचे अंगणात विटा फेकल्या तेव्हा फिर्यादी ही आपले घरात गेली असता आरोपी क्र.०२ हि सुध्दा रोडावर येवुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २९४,५०६,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

४) सोन्या–चांदीचे दागीने व नगदी पैश्याची चोरी . :–

दिनांक ०३/०५/२०१८ चे २१.०० ते दिंनाक ०४/०५/ २०१८ चे ०४.३० वाजता दरम्यान यातील कोणीतरी अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराचे समोरील दाराचा हॅन्डल सरकवुन आत प्रवेश करून फिर्यादीचे घरातील सोन्याची गरसोली ज्यात पदक २ डोरले सोन्याचे मनी १० ग्रॅम, २ सोन्याच्या आंगठया १० ग्रॅम प्रत्येकी ५ – ५ ग्रॅम एकुण १० ग्रॅम लहान मुलाची सोन्याची कंठी ३ ग्रॅम चांदीचे लहान कडे , चांदीच्या पायट्टया व नगदी २०,०००/रु . असा एकुण ४५,२००/रु. चा माल तसेच घराशेजारी राहणा–या हेमकृष्ण लंजे यांच्या घराचे समोरील दाराचा हॅन्डल सरकवुन आत प्रवेश करून त्याचे घरून सोन्याची पोत ज्यात १ पदक व लहान सोन्याचे मनी ८० नग गहु मनी, पोंग–या १२ नग असा एकुण १४ ग्रॅम १ काळी पोत ज्यात २ डोरले सोन्याचे लहान गोल मनी २० नग एकुण ५ ग्रॅम चांदीच्या तोरडया ०७ तोडे असा एकुण २३,०००/रु चा माल दोघांचे घराचा एकुण माल ६८,२००/रु. चा माल चोरून नेल्याने फिर्यादी तुकाराम ताकसु लंजे वय ६५ वर्ष रा. चारगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४५७,३८० भादवी. कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. परशुरामकर पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

५) नगदी पैश्याची चोरी. :–

दिनांक ०४/०५/२०१८ चे ११.५० ते १२.०० वाजता दरम्यान यातील कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीचे राहते घराचे बंद दरवाजा उघडुन आत प्रवेश फिर्यादीचे लोंखडी कपाटातील लॉकरमध्ये नगदी ४,७५,०००/रु. ठेवलेले चोरून नेल्याने फिर्यादी अशोक पंढरीनाथ लिचडे वय ६१ वर्ष रा. सानगडी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४५४,३८० भादवी. कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. निबेंकर पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

६) सोन्याचे दागीने व नगदी पैश्याची चोरी. :–

दिनांक ०३/०५/२०१८ चे १६.०० ते ०४/०५/२०१८ चे ०२.३० वाजता दरम्यान यातील अज्ञात आरोपीने कुणीही नसल्याची संधी साधुन मागील दाराचा कब्जा काढुन आत प्रवेश करून लोखंडी कपाटाला बनावट चाबी लावुन लोखंडी कपाटामध्ये ठेवलेले २ सोन्याच्या आंगठया वजन अंदाजे ०७ ग्रॅम, १ सोन्याची एकदानी वजन अंदाजे ५ ग्रॅम व नगदी ८०,०००/रु. असा एकुण १,०४,०००/रु. चोरून नेल्याने फिर्यादी चेतन यादोराव सोनकुसरे वय २४ वर्ष रा. मुंडरी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन करडी येथे कलम ४५४,४५७,३८० भादवी. कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. कोयंडे पोलीस स्टेशन करडी हे करीत आहेत.

७) सोन्या–चांदीचे दागीने व नगदी पैशाची चोरी:–

दिनांक २९/०४/२०१८ चे ०९.३० ते ०४/०५/२०१८ चे ०९.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा आपले परिवारासह लग्न कार्याकरीता बाहेर गावी गेले असता कुणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीचे घराचे समोरील दाराचा ताला तोडुन आत प्रवेश करून बेडरूमधील लोंखडी आलमारीचा लॉक उघडुन आलमारीत ठेवलेले १ सोन्याची अंगठी १०,ग्रॅम, दोन सोन्याच्या नथ ६ ग्रॅम, दोन जोड कानातील बि–या ३ ग्रॅम, व सोन्याची मनी असलेली गरसोली ५ ग्रॅम, लहान मुलाचे गळयातील सोन्याचे लॉकेट २ ग्रॅम, दोन जोड चांदीचे पायपट्टी व ४ चांदीचे सिक्के व नगदी १२,०००/रु. असा एकुण ६१,६००/रु. चा माल चोरून नेल्याने फिर्यादी गोपाल दामजी चौधरी वय ४७ वर्ष रा. व्यकंटेश नगर कॅनल जवळ गांधीनगर भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५४,४५७,३८०
भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गाढवे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

८) संगनमत करून आग लागुन साहीत्य जळुन नुकसान केल्याने गुन्हा नोंद:–

दिनांक २८/०४/२०१८ चे १६.०० वाजता दरम्यान यातील आरोपी क्र. ०१ व २ यांनी संगनमत करून आपले शेता मध्ये आग लावुन व या आगीमुळे जवळच्या शेतक–याचे मालाचे नुकशान होण्याचे संभव आहे. हे माहीत असतांना सुध्दा आग न विजवीता घरी निघुन गेले आग जवळ – जवळ येवुन यातील फिर्यादीचे शेतावरील बोअर वेलचे प्लॉस्टीक पाईप,रस्सा, थ्री फेस तांब्याचा वायर व प्लॉस्टीक हत्ती पाईप, मास्को कंपनीची मोटार पंप असा एकुण ३६,५००/रु. चा माल जळुन नुकसान केल्याने फिर्यादी यादोराव हिरामन लांजेवार वय ५० वर्ष रा. डोंगरगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ४२७,४३५,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. म्हैसकर पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

९) भांडण करून काठीने मारून दुखापत केल्याने गुन्हा नोंद:–

दिनांक ०४/०५/२०१८ चे १६.०० वाजता दरम्यान यातील आरोपी याने नेहमी प्रमाणे दारू पिवुन येवुन मी तुझा अपघात झालेला भाऊ धोंडु वरवाडे याला १ महिन्या पासुन पोसतो, तुम्ही त्याला आपले घरी आना व त्याला पोसा असे बोलुन फिर्यादी सोबत भांडण करून शिवीगाळ केली व काठीने त्याचे डोक्याचे डावे बाजुवर, भुवईवर मारून आपखुशीने दुखापत करण्यास कारणीभुत झाल्याने, फिर्यादी हिरामन महादेव वरवाडे वय ६० वर्ष रा. गुजरी चौक लाखनी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३२४,५०४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. ऊईके पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

१०) तरूणाचा मृत्यु :–

दिनांक ०४/०५/२०१८ चे १४.५० वाजता दरम्यान यातील मृतक मंगेश परसराम पाठक वय २१ वर्ष रा. अडयाळ यास ग्रामीण रूग्नालय अडयाळ येथे त्याचे रिस्तेदारांनी मृत अवस्थेत आनल्याने तेथील डॉ. नी मृत घोषीत केल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. साठवणे यांचे रिपोर्ट व डॉ. मेमो वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. गिन्हेपुंजे पोलीस स्टेशन अडयाळ करीत आहेत.

११) दारू पिवुन दारूच्या नशेत वाहन चालवीतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :–

दिनांक ०४/०४/२०१८ चे १८.२५ वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल राजीव गांधी चौक भंडारा येथे दारू पिवुन दारूच्या नशेत चालवितांनी मिळुन आल्याने त्याचे ब्रिथ अल्कोहोल ॲनालायझर मशिन द्वारे श्वासाचा नमुना घेतला असता, अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. दुर्गे वानीशा. भंडारा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १८५,(१) मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास पो.ना. साबळे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

१२) दारू पिवुन दारूच्या नशेत वाहन चालवीतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :–

दिनांक ०४/०४/२०१८ चे ०२.२८ वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल एनएच ०६ रोड पो.स्टे. समोर लाखनी येथे दारू पिवुन दारूच्या नशेत चालवितांनी मिळुन आल्याने त्याचे ब्रिथ अल्कोहोल ॲनालायझर मशिन द्वारे श्वासाचा नमुना घेतला असता, अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. तांडेकर यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम १८५,(१) मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास मपोउपनी. आळे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

१३) अवैध हातभट्टी दारु अडड्यांवर धाडी . :–

दिनांक ०४/०५/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा, मोहाडी, तमसर व गोबरवाही येथे अवैध हातभट्टी दारू अडड्यावर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १५१ लिटर हातभंट्टी दारू + १५० किलो सडवा मोहा+ साहीत्य +१ सायकल किंमती २१,२००/रु. चा माल जप्त करण्यात आला.

१४) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक ०४/०५/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १४१ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी वाहतुक– ०७ तीन सिटर वाहनाकरीता– ०२ ईतर वाहनांवरती – १३२ केसेस करण्यात आले आहे.

(मपोउपनि.प्रणती लांजेवार)
माहिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.